# विद्यार्थी वसतिगृहांतील व्यवहार आता कॅशलेस

**(पान १ वरून)** विनाप्रक्रिया शुल्क, ईझी पे कार्डद्वारे पैसे काढण्याची सुविधा, 'पीओएस' मशिन पैशाच्या देवाण-घेवाणीचे व्यवहार अशा अनेक सुविधा देण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून वसतिगृहातील सर्व व्यवहार हे कॅशलेस होतील, अशा पद्धतीने विद्यापीठ पातळीवर कामकाज सुरू झाले आहे. 'स्टुडंट मेस क्लब' हे आदर्शवत मॉडेल आहे. या मेसचे सर्व व्यवहार विद्यार्थ्यांमार्फत चालविले जातात. विद्यार्थ्यांकडून चालविल्या जाणाऱ्या मेसद्वारे माफक दरामध्ये विद्यार्थ्यांना चांगले जेवण देण्याचा प्रयत्न केला जातो. राज्यातील इतर विद्यापीठांपेक्षा हा उपक्रम उल्लेखनीय आणि वेगळा आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAY 2019

तरूण भारत

# एम. फिल., पीएच. डी. ची प्रवेश परीक्षा मराठीतून

प्रतिनिधी
कोल्हापूर



- शिवाजी विद्यापीठ विद्यापरिषदेचा निर्णय
- महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या मागणीला यश

सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत एम. फिल., पीएच. डी. ची प्रवेश परीक्षा इंग्रजी व मराठी भाषेतून घेण्याचा निर्णय विद्यापरिषदेमध्ये घेण्यात आला. महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाची मागणी मान्य केल्याने या संघटनेकडून या निर्णयाचे स्वागत होत आहे. विद्यापरिषदेच्या या निर्णयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संशोधनाची संधी मिळणार आहे.

शिवाजी विद्यापीठातील सर्वच अधिविभागात एम. फिल., पीएच. डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त आहे. पण सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत विद्यार्थ्यांची परीक्षा इंग्रजी भाषेतून असते. त्यामुळे ही परीक्षा देताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणी येतात. त्यामुळे मराठीत अभ्यासक्रम व परीक्षा केल्यास एम. फिल., पीएच. डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होईल. यासाठी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाने मागणी केली होती. विद्यार्थी हित लक्षात घेऊन विद्यापरिषदेने परीक्षा मराठीत घेण्यासाठी मान्यता दिली आहे. विद्या परिषदेच्या या निर्णयाचे शिक्षण क्षेत्रातून स्वागत होत आहे. या निर्णयासह विद्यापरिषदेच्या बैठकीत विद्यार्थी हिताचे अन्य निर्णय घेण्यात आले आहेत.

# विद्यार्थी वसतिगृहांतील व्यवहार आता कॅशलेस

## शिवाजी विद्यापीठात चालू शैक्षणिक वर्षापासून होणार अंमलबजावणी

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

केंद्र सरकारच्या कॅशलेस, डिजिटल भारत धोरणानुसार आता शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृहाचे सर्व व्यवहार कॅशलेस होणार आहेत. कॅशलेस सुविधेमुळे प्रशासकीय कामकाजात वेळेची बचत होणार असून विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व प्रशासनासाठी हे फायद्याचे ठरणार आहे.

काही दिवसांपूर्वी झालेल्या चलन बदलामुळे भारतातल्या अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडले. अनेक वर्षांपासून कॅशलेस व्यवहारांची गरज होती. ते प्रत्यक्षात आणणे आज शक्य होताना दिसत आहे. विद्यापीठात दरवर्षी पाच




हजारांहून अधिक विद्यार्थी विविध अभ्यासक्रमांसाठी ४५ हून अधिक विभागांमध्ये प्रवेश घेतात. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व संशोधन वाटचालीस गती देण्याच्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशासनाकडून चांगल्या सोयी-सुविधा पुरविण्याचा प्रयत्न असतो.

> विद्यापीठाच्या वसतिगृहातील व्यवहार कॅशलेस करण्याच्या दृष्टीने गेल्या काही दिवसांपासून प्रयत्न सुरू होते. त्या अनुषंगाने प्रशासनाने येणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून याची अंमलबजावणी वसतिगृहात करण्याचे ठरविले आहे. याचा विद्यार्थ्यांसह सर्व घटकांना लाभ होईल.
>
> **- प्रा. डॉ. सागर डेळेकर,** मुख्य अधीक्षक, विद्यार्थी वसतिगृह

विद्यापीठात १३ ते १४ वसतिगृहे असून तेथे सुमारे पाच हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था माफक दरात केली जात आहे. विद्यार्थी वसतिगृह व मेस या दोन्ही ठिकाणी विद्यार्थी वसतिगृह फी, खाणावळ फी, डिपॉझिट, मेस फी, खाणावळीतील आर्थिक देवाण-घेवाण यासारखे व्यवहार यापूर्वी रोखीने किंवा चेकद्वारे होत होते; परंतु केंद्र सरकारच्या कॅशलेस धोरणानुसार विद्यार्थी वसतिगृहाचे सर्व व्यवहार कॅशलेस व्हावेत, यादृष्टीने प्रशासन प्रयत्न करीत आहे.

त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठ वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या माध्यमातून शून्य शिलकी खाते उघडणे, **पान २ वर ▶**